मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 3 मे 2024 | पान- 1

# मोहोळांनी जपला पुण्याचा वारसा

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडून मुरलीधर मोहोळ यांचे कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराचा इतिहास आणि वारसा जपण्यासाठी त्यांनी केलेले काम कौतुकास्पद आहे. पुणे महापालिकेतील शिवाजी महाराजांचे स्मारक, महापालिकेत पहिल्यांदा स्थापन केलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा, माता रमाईचे स्मारक, फुले दांपत्याची समता भूमी, लहुजी वस्ताद साळवे यांचे समाधी स्मारक ही काही उदाहरणे आहेत. अशा शब्दात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे कौतुक केले.



करोना काळात पुण्यासारख्या शहरात मोहोळ यांनी चांगले काम केले. त्यामुळे पुणेकरांच्या मनात त्यांच्याबद्दल प्रेम आणि आत्मीयता आहे, तसेच सर्व घटकांना सोबत घेऊन ते करत असलेले काम त्यांना विक्रमी मताधिक्क्याने विजयी करेल असा विश्वास केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केला

निवडणुकांच्या तोंडावर विरोधी पक्षांकडून चुकीच्या पद्धतीने संविधान धोक्यात असल्याचे बिनबुडाचे आरोप केले जात आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये संविधान बदलले जाणार नाही. तुमच्यामध्ये गैरसमज पसरवण्यात येत आहे, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ आठवले यांनी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आरपीआय आठवले गटाचे सचिव संघटक परशुराम वाडेकर, सचिव बाळासाहेब जानराव, आरपीआयचे अध्यक्ष संजय सोनावणे, मंदार जोशी, महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर आदी यावेळी उपस्थित होते..

आठवले म्हणाले, की विरोधकांकडून संविधान बदलाची उलटसुलट चर्चा केली जात आहे. लोकशाही धोक्यात आली आहे, असा प्रचार सुरू आहे. लोकशाही जर धोक्यात आली असती, तर पंतप्रधान मोदी मत मागण्यासाठी देशभर फिरले असते का? संविधानावर देश चालणार आहे. विरोधकांनी कितीही बाता मारल्या, तरी संविधानाप्रमाणेच देशाला चालवावे लागेल. देश म्हटला की संविधानाची भूमिका, गीता, कुराण बायबल असे अनेक धर्मांचे ग्रंथ आहेत. याचा आदर सर्वांना आहे. संविधानाने आपापल्या धर्माप्रमाणे चालण्याची परवानगी दिली आहे. देश म्हटला की, संविधान आणि या देशात त्यालाच राहण्याचा अधिकार आहे, ज्याला बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान मान्य आहे.

### एनडीए 400 पेक्षा अधिक जागा जिकेल

**» देशभरामध्ये एनडीएचे वातावरण आहे. त्यामुळे एनडीएच्या चारशेपेक्षा जास्त जागा निवडून येतील, असा विश्वास आठवले यांनी व्यक्त केला. राज्य आणि देशभरातील मोदींच्या सभांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. एससी, एसटी आणि ओबीसी समाजाला न्याय देण्याची भुमिका मांडली जात आहे. त्यामुळे आम्हाला विश्‍वास आहे, की आमच्या महाराष्ट्रात 40 पेक्षा जास्त जागा निवडून येतील, असा दावाही आठवले यांनी या वेळी व्यक्त केला.**

# पुणेकरांची मागणी पीटी-3 अर्जाला मुदतवाढ द्या

## सुमारे अडीच लाख मिळकतधाकरांनी अर्ज न भरल्याने लाभ नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणेकरांना निवासी मिळकतीत असलेली ४० टक्के सवलत, तसेच मागील थकबाकी राज्य शासनाने रद्द केली होती. या आदेशाची अंमलबजावणी महापालिकेने मे ते नोव्हेंबर २०२३ पर्यंत केली. मात्र, त्यानंतरही सुमारे अडीच लाख मिळकतधाकरांनी पीटी-३ अर्ज न भरल्याने त्यांना शासनाच्या या निर्णयाचा लाभ मिळालेला नाही.

आता त्यांच्याकडून तक्रारी केल्या जात असून प्रशासनाने ही पीटी-३ अर्जाच्या शासन आदेशास मुदतवाढीबाबत विचार करण्याचा प्रस्ताव करसंकलन विभागाने महापालिका आयुक्तांच्या समोर ठेवला आहे.

महापालिकेने २०१९ पासून नवीन मिळकतींना ही सवलत देणे बंद केले होते. अशा सुमारे २ लाख ५२ हजार मिळकती असून, त्या पूर्वीच्या सुमारे ९७ हजार मिळकतींमध्ये भाडेकरू राहत असल्याने महापालिकेने त्यांनाही चार वर्षे मागे जात सवलत रद्द करून ४० टक्के कर आकारणीचे वाढीव बिले दिले होते. त्यातील केवळ ८७ हजार मिळकतींनीच पीटी-३ अर्ज भरला आहे. तर सुमारे अडीच लाख मिळकतींना पुन्हा पूर्वीप्रमाणे वाढीव बिले आलेली आहेत.



महापालिकेस शासनाच्या आदेशास मुदतवाढ द्यायची असल्यास पुन्हा शासनाकडे मागणी करावी लागणार आहे. त्यातच हा धोरणात्मक निर्णय असल्याने महापालिका आयुक्तांना आचारसंहितेत हा निर्णय घेता येणार का या बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महापालिका प्रशासनाकडून जून अखेर पर्यंतचा प्रस्ताव ठेवला असला तरी ५ ते ६ जून पर्यंत लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता आहे त्यामुळे, महापालिका आयुक्त काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### काय होता शासनाचा आदेश

**» शहरात १९७० पासून मिळकतधारक स्वत: राहत असल्यास मिळकतकरात ४० टक्के सवलत दिली जाते. मात्र, २०१९ पासून शासनाने ती बंद केली. त्यामुळे सुमारे साडेतीन लाख मिळकतींना वाढीव बिले आल्याने मोठा गदारोळ झाला.त्यामुळे शासनाने निर्णय घेत जे मिळकतधारक स्वत: राहत असतील त्यांनी पीटी ३ अर्ज भरून दिल्यास त्यांना आलेले वाढीव बिल रद्द करणे तसेच २०१९ पासून त्यांनी भरलेला ४० टक्के जादा कर त्यांना पुढील चार वर्षे समान हप्त्यात परत करण्याचा आदेश दिला. त्यानुसार, महापालिकेने या सर्व मिळकतधारकांना सवलत दिली.**

# ...अन् अबकी बार बारणे खासदार

## बारणेंवर स्वतःच घोषणा करण्याची आली वेळ! चर्चेला उधाण

**पुणे | प्रतिनिधी**

उमेदवार श्रीरंग बारणेंनी भाषण करत 'अबकी बार मोदी सरकार, अबकी बार श्रीरंग बारने खासदार' अशी घोषणा केली. यावेळी त्यांच्या घोषणेला विशेष असा प्रतिसाद मिळाला नाही.

अबकी बार मोदी सरकार... अबकी बार श्रीरंग बारणे खासदार अशी स्वतःच म्हणण्याची वेळ बारणेंवर आली आहे. आज आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष रामदास आठवले यांची जाहीर सभा झाली. या सभेत आठवले यांच्या समोर उमेदवार श्रीरंग बारणेंनी भाषण करत 'अबकी बार मोदी सरकार, अबकी बार श्रीरंग बारने खासदार' अशी घोषणा केली. यावेळी त्यांच्या घोषणेला विशेष असा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे चर्चेला उधाण आले आहे.




शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार श्रीरंग बारणे हे मावळ लोकसभा निवडणूक लढवत आहेत. २०१४ आणि २०१९ या दोन्ही लोकसभेच्या वेळी बारणे यांनी बलाढ्य अशा उमेदवारांना पराभूत केलं होतं. यावेळी मात्र चित्र उलट आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजोग वाघेरे यांचं बारणे यांच्यासमोर आव्हान असणार आहे. बारणे यांच्या प्रचारासाठी आज पिंपरीत सभा घेण्यात आली. यावेळी रामदास आठवले यांनी या सभेला संबोधित केलं.

सभेत बारणे म्हणाले, ही निवडणूक नात्यागोत्याची नसून देश कुणाच्या हातात द्यायचा यासाठी आहे. विरोधक माझ्याबद्दल गैरसमज पसरण्याचे काम सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी श्रीरंग बारणे यांनी 'अबकी बार मोदी सरकार.. अबकी बार श्रीरंग बारणे खासदार' असं म्हणत स्वतःचीच पाठ थोपटून घेतली. यामुळे सभेदरम्यान बारणेंच्या या घोषणेमुळे चर्चांना उधाण आले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघातून ३८ उमेदवारांनी अर्ज भरले होते. त्यापैकी छाननीमध्ये तीन अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद झाले, तर ३५ उमेदवार पात्र ठरले होते. अर्ज माघारी घेण्याची सोमवारी अंतिम मुदत होती. त्यामध्ये दोन उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे मावळ लोकसभा मतदारसंघाच्या रिंगणात ३३ उमेदवार राहिले आहेत. महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे आणि महायुतीचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यामध्ये खरी लढत होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

सभेत रामदास आठवले यांच्या समोर उमेदवार श्रीरंग बारणेंनी भाषण करत होते. त्यावेळी ते म्हणाले, 'अबकी बार मोदी सरकार, अबकी बार श्रीरंग बारने खासदार'. त्यावेळी त्यांच्या या घोषणेला विशेष असा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. महायुतीचे सर्व उमेदवार 'अबकी बार मोदी सरकार, अबकी बार चारसो पार'च्या घोषणा देत आहेत पण बारणे यांच्या 'अबकी बार श्रीरंग बारने खासदार' या घोषणेने सर्वांचे लक्ष वेधले.

### बारणेंच्या या घोषणेची जोरदार चर्चा

» श्रीरंग बारणे यांचं भाषण झालं. ही निवडणूक नात्यागोत्याची नसून देश कुणाच्या हातात द्यायचा यासाठी असल्याचे मत बारणे यांनी व्यक्त केलं. विरोधक माझ्याबद्दल गैरसमज पसरवत आहेत, असं देखील त्यांनी म्हटले आहे. याच दरम्यान श्रीरंग बारणे यांनी 'अबकी बार मोदी सरकार.. अबकी बार श्रीरंग बारणे खासदार' असं म्हणत स्वतःचीच पाठ थोपटून घेतली. यामुळे सभेदरम्यान बारणेंच्या या घोषणेची जोरदार चर्चा सुरू आहे.


# शहरातील पथारी व्यावसायिकांकडे 56 कोटीची थकबाकी

## 9 हजार पथारी व्यावसायिकांची तब्बल 56 कोटीची थकबाकी असल्याचे समोर आले

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील ९ हजार ८५२ पथारी व्यावसायिकांची तब्बल ५६ कोटी १७ लाख रुपयांची थकबाकी असल्याचे समोर आले आहे. ही थकबाकी भरावी अन्यथा परवाना रद्द केला जाईल असा इशारा पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागातर्फे देण्यात आला आहे.

केंद्र सरकारने २०१४ मध्ये फेरीवाला धोरण जाहीर केले. त्यानुसार रस्त्यावर विविध प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या कष्टकऱ्यांना अधिकृतपणे व्यवसाय करण्याचा परवाना दिला गेला. यामध्ये प्रत्येकाचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यात आले त्यांना अ, ब, क, ड, इ या या श्रेणीनुसार परवाना देण्यात आले.



महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात २३ हजार १६६ जणांची नोंदणी करण्यात आली. त्यापैकी १२ हजार ११३ जणांचे शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील ५२५ झोनमध्ये पुनर्वसन करण्यात आले. तर उर्वरित परवानाधारक कोठेच व्यवसाय करत नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे परवाने रद्द केले आहेत.

महापालिकेने कोरोना काळात पथारी व्यावसायिकांचे व्यवसाय बंद असल्याने त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे स्थायी समितीने या काळातील सुमारे १२ कोटी रुपये शुल्क माफ केले होते.

पण त्यानंतरही अनेक व्यावसायिकांनी नियमीत शुल्क भरणा करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. शहरात एकूण परवाना धारक आणि पुनर्वसन झालेले १२ हजार ११३ व्यावसायिक आहेत. त्यापैकी ९ हजार ८५२ जणांनी ५६ कोटी१७ लाख ४२ हजार रुपये शुल्क थकविले आहे

अनेकदा शुल्क भरण्यासाठी आवाहन करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने महापालिकेने आता कारवाईचा बडगा उचलण्याचा निर्णय घेतला आहे. शुल्क न भरल्यास परवाना रद्द केला जाईल, परवान्याचे नूतनीकरण केले जाणार नाही, असा इशारा उपायुक्त माधव जगताप यांनी दिला आहे.

### 54 कोटी रुपये भरले

» एकीकडे ५६ कोटीची थकबाकी असताना दुसरीकडे जानेवारी २०१८ ते मे २०२४ या कालावधीत ५४ कोटी ८७ लाख ५४ हजार रुपयांचे शुल्क महापालिकेकडे व्यावसायिकांनी भरले आहे. त्यामुळे ज्यांनी शुल्क भरले आहे त्यांच्याकडे कोणतीही कारवाई होणार नाही.

# “पिंपरी-चिंचवड फर्स्ट” फोरमचा जाहीरनामा!

## पीसीसीएफचा पुढाकार, कनेक्टिंग एनजीओ पीसीएमसीद्वारे तज्ञांचा सल्ला

**पिंपरी | प्रतिनिधी**

येत्या काही दिवसांत, 18 व्या लोकसभेसाठी निवडणुका पार पडणार आहेत. हे मतदान आपल्या सर्वांसाठी एक अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे कर्तव्य आहे. पिंपरी-चिंचवड सिटिझन फोरम (PCCF) आणि कनेक्टिंग NGO PCMC यांच्यामाध्यमातून नागरिकांना जागरूक मतदार बनण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, PCCF द्वारे “सिटिझन मॅनिफेस्टो” प्रसिद्ध केला असून, मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघांमधून निवडणूक लढणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी नागरिकांच्या मागण्यांची यादी आहे. हा मॅनिफेस्टो नागरिकांना त्यांच्या निवडणुकीच्या प्राधान्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी आणि उमेदवारांना जबाबदार धरण्यासाठी तयार केले आहे.

PCCF चे संस्थापक समन्वयक अमोल देशपांडे म्हणाले की, नागरिक जाहीरनामा अनेकदा प्रभावशाली असते आणि निवडणुकीच्या निकालावर परिणाम करू शकते. आम्ही 2014 च्या लोकसभा निवडणुकीपासून नियमितपणे जाहीरनामे प्रकाशित करत आहोत, त्यानंतर 2014 विधानसभा, 2017 महापालिका, 2019 लोकसभा आणि 2019 विधानसभा निवडणुकांसाठी देखील जाहीरनामे प्रकाशित केले.




### PCCF च्या जाहीरनाम्यातील मुद्दे

» **नागरिक हक्क व कायदे : 1. एक शहर एक मतदारसंघ, 2. सरकारी कार्यालयांचे विकेंद्रीकरण, 3. केंद्र सरकारच्या योजना, आरोग्य : आयुष्मान भारत योजना, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग, जबाबदारी , शिक्षणाचा अधिकार (RTE), माहितीचा अधिकार (RTI), सेवांचा अधिकार (RTS), ७४ वी घटनादुरुस्ती**

प्रारंभिक निवडणुकांमध्ये, राजकीय पक्षांनी आमच्या मागण्यांकडे लक्ष दिले नाही. तथापि, हळूहळू परिस्थिती बदलली आणि प्रत्येक निवडणुकीनंतर, राजकीय पक्षांनी आमच्या घोषणापत्रातील मुद्द्यांवर विचार करण्यास सुरुवात केली. 2017 च्या महापालिका निवडणुकीसाठी, तत्कालीन सत्ताधारी पक्ष – भाजपने आमच्या मसुद्याचा स्वीकार केला, हे आमच्यासाठी एक मोठे यश होते! यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत झाली.

नागरिकांचा शासन प्रक्रियेत सहभाग : 1. स्मार्ट सिटी शासन, 2. नागरी प्रतिबद्धता, 3. अर्थसंकल्पीय पारदर्शकता आणि सहभाग, 4. स्थानिक सेवा वितरण सुधारणा,

आरोग्य व स्वच्छता: 1. आरोग्य सुविधा उपलब्धता, 2. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, 3. स्वच्छता, 4. पोषण आणि अन्न सुरक्षा , 5. मानसिक आरोग्य, 6. माता आणि बाल आरोग्य, 7. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, 8. आरोग्यसेवा पायाभूत सुविधा, 9. डिजिटल आरोग्य सेवा, 10. समुदाय सहभाग आणि प्रतिबद्धता.

शिक्षण व कौशल्य: 1. सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण , 2. कौशल्य आणि रोजगार क्षमता, 3. स्टार्टअप इकोसिस्टिम चालना देणे, 4. एज्युकेशन हब.

पर्यावरण व ऊर्जा: 1. पर्यावरण संरक्षण कायद्यात सुधारणा, 2. पवना, इंद्रायणी, मुळा नदी पुनरुज्जीवन, 3. वेस्ट टू वेल्थ टेक्नॉलॉजी पार्क, 4. स्वच्छ भारत मिशन (SBM), 5. सौर ऊर्जा, 6. ई-वाहन / ईव्ही, 7. हरित पिंपरी चिंचवड, 8. वायू प्रदूषण, 9. भूजल संवर्धन, ग्लोबल वार्मिंग आणि हवामान बदल.

हवामान आणीबाणी घोषणा: सरकारने हवामान बदलाच्या गंभीरतेला ओळखून तात्काळ हवामान आणीबाणी घोषित करणे आवश्यक आहे\. यामुळे त्वरित आणि निर्णायक कारवाईसाठी आवश्यक असलेली राजकीय इच्छाशक्ती निर्माण होईल.

खासदारांची भूमिका: हवामान बदलाशी लढण्यासाठी आणि हवामान न्याय मिळवण्यासाठी आमचे निवडून आलेले खासदारांनी सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे. यात कठोर हवामान धोरणांना समर्थन देणे, जीवाश्म इंधनावर सबसिडी कमी करणे आणि स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानात गुंतवणूक करणे समाविष्ट आहे.

पाणी व्यवस्थापन : 1. पाणीपुरवठा, 2. जल व्यवस्थापन.

स्मार्ट पोलिसिंग व न्याय : 1. स्मार्ट पोलिसिंग, 2. न्यायिक सुधारणा

माहिती तंत्रज्ञान : 1. गव्हर्नन्स 4.0, 2. सुशासन आणि ई-गव्हर्नन्स, 3. मल्टिमीडिया तंत्रज्ञान, 4. नागरिक सेवा केंद्र

शहरी नियोजन व रचना : 1. सरकारी कार्यालयांसाठी क्लस्टर, शहर व्यवसाय अधिवेशन आणि प्रदर्शन केंद्र, संसाधन व्यवस्थापन धोरण, 4. फेरीवाला धोरण, रस्ते विकास आणि देखभाल, PCNTDA, रेड झोन.

औद्योगिक आर्थिक प्रगती: इनोव्हेशन आणि आयटी हब, इनोव्हेशन परिसंस्थेचा विकास करणे, आयटी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, इलेक्ट्रॉनिक क्लस्टर: ई-वाहतूक उद्योगाला चालना देणे, लघु आणि मध्यम उद्योग (एसएमई), औद्योगिक महानगर.

### वाहतूक व दळणवळण

» **UMTA चे सक्रियकरण, 2. शहरी वाहतूक योजना, 3. मेट्रो, मेट्रो मार्ग, मेट्रो संबंधित इतर महत्त्वाचे प्रकल्प, रेल्वे वाहतूक, महत्वाचे प्रकल्प, नवीन मार्ग, सार्वजनिक वाहतूक, पीएमपीएमएल सुधारणांसाठी शिफारसी, रिक्षा, एसटी आणि खाजगी बसेस, कॅब सेवा, रस्ते वाहतूक, अंतर्गत कनेक्टिव्हिटी, पूर्व-पश्चिम कनेक्टिव्हिटी, उत्तर-दक्षिण कनेक्टिव्हिटी, रिंग रोड, बाह्य कनेक्टिव्हिटी, राष्ट्रीय/ राज्य महामार्ग, द्रुतगती मार्ग, इतर वाहतूक पर्यायी, मोटार वाहन (दुरुस्ती)**

# कोयत्याचा धाक, गुंडगिरी करणारा तडीपार

## दोघांवर मोक्काअंतर्गत कारवाई; चिखली पोलिसांची कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दहशत पसरविणाऱ्या आदर्श उर्फ सोन्या विठ्ठल लुडेकर याला तडीपार करण्यात आले आहे. सोन्या हा चिखली परिसरात व्यावसायिकांसह इतरांना धमकावत असायचा. गुंडगिरी, दादागिरी करायचा. त्याच्या दहशतीमुळे नागरिक त्रस्त झाले होते. पुढे येऊन पोलिसात तक्रार देत नव्हते. अखेर त्याला चिखली पोलिसांनी दोन वर्षांकरिता तडीपार केले आहे. चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत दादागिरी आणि गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. असा इशारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांनी दिला आहे.



पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील गुन्हेगारी कमी करण्याच्या उद्देशाने अनेक पावले उचललेली आहेत. लोकसभा निवडणुकीत काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरातील सराईत गुन्हेगारांचा बंदोबस्त केला जात आहे. चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत आदर्श उर्फ सोन्या विठ्ठल लुडेकर या सराईत गुन्हेगाराला चिखली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांनी तडीपारचा प्रस्ताव तयार करून तो पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांनी पारित करून दोन वर्षांकरिता दहशत पसरविणाऱ्या आदर्श उर्फ सोन्या विठ्ठल लुडेकर याला पिंपरी- चिंचवड, पुणे पोलीस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामीण हद्दीतून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे.

### गुन्हेगारांवर मोक्काअंतर्गत कारवाई

» **कोयत्याचा धाक दाखवून लूटमार करणाऱ्या प्रकाश उर्फ गणेश नामदेव श्रीगोंड आणि साथीदार महादेव दुन्डप्पा दिंडुरी या दोघांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पैकी प्रकाश उर्फ गणेश नामदेव श्रीगोंड याच्यावर चिखली, भोसरी, वाकड, सोलापूर दक्षिण या परिसरात जबरी चोरी, चोरी, घरफोडी, धारदार शस्त्र बाळगणे असे एकूण १८ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या साथीदारावर दहा गुन्हे दाखल आहेत.**

# आमचा आत्मा पक्ष, घरं फोडत नाही

## खासदार डॉ. अमोल कोल्हे : ओतूर येथे सभेत दिले अनेक दाखले

**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींना मी फार नम्रपणे सांगू इच्छितो की, होय शरद पवार हे आजच्या महाराष्ट्राचा आत्मा आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांचा महिलांचा आणि कष्टकऱ्यांचा युवकांचा आत्मा आहे, असे उत्तर देत खासदार अमोल कोल्हे यांनी सत्ताधाऱ्यांना अनेक दाखले दिले.

शिरुर मतदार संघातील महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ ओतूरमध्ये जेष्ठ नेते पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार अशोक पवार, माजी आमदार ॲड. राम कांडगे, बाळासाहेब दांगट, दिलीप ढमढेरे, शिवसेना उपनेते बबनराव थोरात, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश भोर, उपजिल्हाप्रमुख संभाजी तांबे, बाबा परदेशी, अनंतराव चौगुले, सुनिल मेहेर, बाजीराव ढोले, शरद चौधरी, बाळासाहेब बाणखेले, अल्लूभाई इनामदार, अनिल तांबे, दिपक औटी, बाबू पाटे, सुरेखा वेठेकर, राजश्री बोरकर, किशोर दांगट, शरद लेंढे, सूरज वाजगे आदी उपस्थित होते.



डॉ. कोल्हे म्हणाले, हे जेव्हा भटकत होते जेव्हा भूजला भूकंप झाला होता. तेव्हा स्व. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. त्यावेळी संपूर्ण संसदेत विरोधकांना विरोध न करता मी भूजच्या पुनर्वसनाला जाणार हे सांगणारे एकमेव आत्मा शरद पवार होते आणि आज तुम्ही आरोप करता.

जेव्हा कांद्याच्या माळा घालून तुम्ही संसदेत आंदोलन करत होता ना आणि आमच्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांची ताटात माती कालवत होता ना, तेव्हा काही झालं तरी माझ्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवणार नाही, हे ठामपणे सांगणारी आत्मा शरद पवार आहे. याला आम्ही पवित्र मानतो. आम्ही आमच्या आत्म्याला जपतो, कायम जपणार आहोत. आमचा आत्मा पक्षं, घर फोडत नाही, असे अमोल कोल्हे यावेळी म्हणाले.

### शरद पवारांनी सुनावले खडेबोल

» पंतप्रधान राहुल गांधींवर टीका करतात. शहाबजादे क्या करेंगे? म्हणताना मोदींना कायतरी वाटायला हवं, असे शरद पवार म्हणाले. राहुल गांधींच्या तीन पिढ्या देशासाठी लोकशाही बळकट करण्यासाठी झटल्या आहेत. आधुनिकेतवर देश पुढं जावा, यासाठी लढा उभारणाऱ्या राजीव गांधींची हत्या झाली.वडील आणि आज्जींनी देशासाठी बलिदान दिलं. त्या राहुल गांधींना म्हणतात शहाबजादे काय करणार? कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत भारत जोडो यात्रा काढली, जनतेचे प्रश्न जाणून घेतले. पण याबाबत बोलण्याऐवजी मोदी काहीही बोलतायेत. खोट्या गोष्टी सांगत आहेत. चुकीच्या पद्धतीने टीका टिपणी करत असतील. तर अशांच्या हातातून सत्ता काढून घेणं गरजेचं आहे.

# माऊलींच्या पालखी सोहळ्यात रंगणार 7 रिंगण सोहळे

## संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याचे अधिकृत वेळापत्रक जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याचे अधिकृत वेळापत्रक जाहीर झाले आहे. दरम्यान, या सोहळ्यात सात रिंगण सोहळे रंगणार आहेत. ज्येष्ठ वद्य अष्टमीला (दि. 29 जून) शनिवारी सायंकाळी 4 वाजता माउलींच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होईल, अशी माहिती माऊली देवस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दिली.

पहिला मुक्काम आळंदी येथेच दर्शन मंडप इमारत (गांधी वाडा) येथे असेल तर 30 जूनला पालखी सोहळा सकाळी पुणे मुक्कामाकडे मार्गस्थ होईल. 30 जून आणि 1 जुलैला पालखी सोहळ्याचा मुक्काम पुण्यात असेल.

देवस्थानने दिलेल्या माहितीनुसार, पुणे येथे दोन दिवसांच्या मुक्कामानंतर पालखी सोहळा 2 जुलैला सकाळी सासवड मुक्कामाकडे मार्गस्थ होईल. 2 जुलै आणि 3 जुलै असे दोन दिवस पालखी सोहळा सासवड मुक्कामी असेल.पालखी सोहळ्याचा 4 जुलैचा मुक्काम जेजुरी, 5 जुलै वाल्हे, 6 आणि 7 जुलै लोणंद, 8 जुलै तरडगाव, 9 जुलै फलटण, 10 जुलै बरड, 11 जुलै नातेपुते, 12 जुलै माळशिरस, 13 जुलै वेळापूर, 14 जुलै भंडीशेगाव, 15 जुलै वाखरी, तर आषाढ शुद्ध दशमीला 16 जुलै पालखी सोहळा पंढरपूर मुक्कमी पोहोचेल. 17 जुलैला आषाढी एकादशी आहे. 20 जुलैपर्यंत पालखी सोहळा पंढरपूरात राहील.



त्यानंतर 21 जुलैला पालखीचा परतीचा प्रवास सुरु होईल. 30 जुलैला पालखी परतीचा प्रवास करुन आळंदी मुक्कामी पोहोचेल.

महत्वाच्या तारखा – प्रस्थान – 29 जून आषाढी एकादशी – 17 जुलै नीरा स्नान – 6 जुलै येथे दोन दिवस मुक्काम –पुणे – 30 जून आणि 1 जुलैसासवड – 2 आणि 3 जुलैलोणंद – 6 आणि 7 जुलै

गेल्या दोन वर्षातील कोरोनाच्या महामारीनंतर यंदा प्रथमच संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आषाढी पायी वारीसाठी 21 जूनला आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवेल. यंदा पालखी सोहळ्यात तिथीची वृध्दी झाल्याने लोणंदमध्ये अडीच दिवस तर फलटणमध्ये दोन दिवस पालखी सोहळा मुक्कामी राहणार आहे. शिवाय दिंडीकऱ्यांच्या मागणीनुसार यंदापासून संस्थानच्या सही शिक्क्यांचे सहभागी दिंड्यांना वाहन पास दिले जातील

### रिंगण कधी आणि कुठे ?

» – 8 जुलै – चांदोबाचा लिंब येथे पहिले उभे रिंगण
– 12 जुलै – पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण
– 13जुलै – खुडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण
– 14 जुलै – ठाकूर बुवाची समाधी येथे तिसरे गोल रिंगण, (टप्पा येथे बंधुभेट संत सोपानदेव पालखी भेट)
– 15 जुलै – बाजीरावची विहीर येथे दुसरे उभे रिंगण, चौथे गोल रिंगण
– 16 जुलै – वाखरी येथे पादुकांजवळ तिसरे उभे रिंगण